# जिल्ह्याच्या माजी खासदार तथा अहमदनगर-बीड-परळी रेल्वे मार्गाच्या शिल्पकार स्व.केशरकाकू क्षीरसागर यांची १९ वी पुण्यतिथी









बीड । दिव्य न्युज

जिल्ह्याच्या माजी खा.तथा अहमदनगर-बीड-परळी रेल्वे मार्गाच्या शिल्पकार स्व.केशरकाकू क्षीरसागर यांच्या १९ व्या पुण्यतिथीनिमित्त आज सकाळपासूनच अनेकांनी अभिवादन करण्यासाठी गर्दी केली होती. समाधी स्थळावर जिल्हाभरातील विविध क्षेत्रातील व्यक्तींनी उपस्थित राहून काकूंना अभिवादन केले. यावेळी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, रविंद्र क्षीरसागर, विठ्ठल क्षीरसागर, डॉ.दिपाताई क्षीरसागर, डॉ.योगेश क्षीरसागर, डॉ.सारिका क्षीरसागर, हेमंत क्षीरसागर, रोहित क्षीरसागर, हर्षद क्षीरसागर यांच्यासह जिल्ह्यातील वारकरी संप्रदाय, राजकीय, सामाजिक पत्रकारिता क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी स्व.काकूंना अभिवादन केले. यावेळी आदर्श, नवगण, विनायक शिक्षण संस्थेचा संपूर्ण परिवार उपस्थित होता. काकूंच्या पुण्यतिथीनिमित्त रामायणाचार्य ह.भ.प.रामराव ढोक महाराज यांचे किर्तन आयोजीत करण्यात आले होते



## गोरक्षनाथ टेकडीवर राजेंद्र महाराज चोरडिया यांचे कीर्तन

बीड । दिव्य न्युज

विसाव्या शतकातील महान संत किसनबाबा यांच्या २८ व्या वर्षातील दुसऱ्या पुण्यतिथी आश्विन शुद्ध पौर्णिमे निमित्त श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी (ता. जि. बीड) येथे धार्मिक वातावरणात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.



या कार्यक्रमाचा मुख्य आकर्षण म्हणून मंगळवार, दिनांक ७ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी १२ ते २ या वेळेत ह.भ.प. राजेंद्र महाराज चोरडिया (संभाजीनगर) यांचे कीर्तन होणार आहे. या कीर्तनाद्वारे संत विचारांचा संदेश भाविकांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे. पुण्यतिथी निमित्त सकाळी ८ वाजता बाबांचा पालखी सोहळा निघणार असून, सकाळी ९ ते १० वाजेपर्यंत गर्भांद्री पर्वत प्रदक्षिणा पार पडणार आहे. कार्यक्रमानंतर सर्व भाविक भक्तांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून, यासाठी समस्त गावकरी देवळा यांनी पुढाकार घेतला आहे. या कार्यक्रमात भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून संतकृपेचा लाभ घ्यावा, असे गुरूवर्य शांतीब्रह्म ह.भ.प. नवनाथ महाराज यांनी आवाहन केले आहे.

## जिंतुर तालुक्यातील भोगाव- इटोली- दाभा डिग्रस या ग्रामीण भागातील रस्ता दुरुस्तीसाठी नागेशभाऊ तडकसे यांचा स्वखर्चातून दुरुस्ती

जिंतूर । दिव्य न्युज : सालेह चाऊस

जिंतूर तालुक्यात या वर्षीच्या सतत धारपाऊस व अतिवृष्टी मुळे शहराला जोडणाऱ्या ग्रामीण रस्त्यांची दुरावस्ता झाली आहे. अशातच भोगावं- इटोली ते दाभा डिग्रस त्रिफुली पर्यंतचा रस्ता सुद्धा खड्डेयुक्त झाला होता. त्या मुळे ग्रामस्थांना शहराकडे येण्याची तारेवरची कसरत करावी लागत आहे.ह्या रस्त्यावरून बरेच खड्डे झाले होते व हा रस्ता जिंतूर ला जोडलेले असल्या मुळे गावोगावच्या लोकांना त्रास होत होता. मा.ना. मेघना दिदी बोर्डीकर आणि रामप्रसादजी बोर्डीकर साहेब यांनी गावकऱ्यांच्या मागणीची दखल घेऊन नवरात्र महोत्सव काळात या रस्त्याची प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली. रस्त्याच्या दुरुस्ती करिता निधी उपलब्ध करुन देण्याची हमी दिली.



परंतु आता जर दुरुस्तीला शासनाने निधी देण्यास विलंब झाल्यास वेळ लागल्यास तो पर्यंत ग्रामस्थाना त्रास होईल म्हणून तात्पुरती हा रस्ता दुरुस्ती साठी अशा प्रसंगी इटोली येथील युवा नेते श्री नागेशभाऊ तडकसे यांनी पुढाकार घेतला आणि सदरील रस्त्यावर झालेले खड्डे बुजवण्याचं काम स्वखर्च्यातून करण्याची तयारी दर्शवली. त्या कामाची सुरवात त्यांनी आज दिनांक ४/१०/२०२५ रोज शनिवार पासुन चालू केली असून लवकरच गावकऱ्यांना या खड्या पासून मुक्तता मिळणार आहे. इटोली पंचक्रोशीतुन नागेश भाऊ तडकसे यांच्या ह्या सामाजिक उपक्रमा बददल त्यांचे कौतुक करण्यात येत असून त्यांचे सर्वजण आभार मानीत आहेत.

आज कामाला प्रत्यक्ष सुरवात झाली असून उदघाटन प्रसंगी इटोली गावाचे सरपंच यांच्या हस्ते नागेश भाऊ तडकसे यांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. उदघाटन सोहळ्याला उपस्थित असलेलं मा. रमेशभाऊ दरगड अध्यक्ष व्यापारी महासंघ जिंतूर, जगदीशराव घुगे,उमाकांत तडकसे, सुभाषराव घुगे, माऊली घुगे. मनीष घुगे, शिवाजी तोडकर,महादेव आवटे गणेशनगर चे सरपंच राजु राठोड बाळासाहेब आवटे अशोक नागरे हरिभाऊ शिंदे उमाघळे बालाजी चव्हाण बाळू शेळके उमाकांत आप्पा तडकसे संदीप घुगे रमेश राऊत मांडवा सरपंच सिताराम कोकाटे शिवाजी तोडकर दत्तू कुमार मगर व पंचक्रोशीतील इतर गावकरी मंडळी उपस्थित होत

## आम आदमी पार्टी-केज तालुका कार्यकारिणी जाहीर

### ॲड.दिनेश बिक्कड तालुका अध्यक्ष तर ईश्वर शाहरुख उपाध्यक्ष म्हणून निवड



बीड । दिव्य न्युज

आम आदमी पार्टीच्या (--झ) बीड जिल्हा पातळीवरील संघटनेच्या बळकटीसाठी आणि पक्षप्रमुख माननीय अरविंद केजरीवाल यांच्या विचारसरणीने प्रेरित होऊन, तसेच महाराष्ट्र राज्याचे कार्यकारी अध्यक्ष श्री. अजित फटके पाटील यांच्या आदेशानुसार, केज तालुक्याची नवीन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे.

या कार्यकारिणीत पुढील पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली: तालुका अध्यक्ष - एडवोकेट दिनेश बिक्कड उपाध्यक्ष - ईश्वर शाहरुख सचिव - विजय वनवे सहसचिव - अक्षय शाहरुख मीडिया प्रमुख - शशिकांत पोपट आंधळे संघटन मंत्री - अमोल वनवे सह संघटन मंत्री - वैभव चाटे अल्पसंख्याक विभाग प्रमुख - आबा हाके शेतकरी आघाडी प्रमुख - श्रीनाथ बिक्कड विद्यार्थी आघाडी प्रमुख - अमोल देशमुख या वेळी आम आदमी पार्टीचे बीड जिल्हाध्यक्ष माजी सैनिक अशोक येडे, जिल्हा उपाध्यक्ष रफिक पठाण व जोशी, बीड शहर प्रमुख सय्यद सादेक, अल्पसंख्याक विभाग प्रमुख नासिर मुंडे, मीडिया प्रमुख रामभाऊ शेरकर, तसेच बाजीराव जे. ढाकणे आदी पदाधिकारी उपस्थित होते. केज तालुक्यात येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांमध्ये आम आदमी पार्टी प्रभावीपणे सर्वसामान्यांचे प्रश्न उचलून शिक्षण आरोग्य विद्यार्थी शेतकरी यांचे प्रश्न घेऊन काम करेल, असा विश्वास या वेळी व्यक्त करण्यात आला.

## रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (खरात गट) जिल्हा व तालुका कार्यकारिणी जाहीर

पात्रुड । दिव्य न्युज

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया खरात गट) पक्षाच्या जिल्हा व तालुका पद नवनियुक्ती दि. ३०/९/२०२५ रोजी अंबाजोगाई येथील विश्रामगृह येथे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया(खरात गट) चे बीड जिल्हाध्यक्ष जीवन गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र देऊन संपन्न झाली.



रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया खरात गट पक्षाच्यावतीने बीड जिल्हा सरचिटणीस पदी नईम करीम आतार , महिला जिल्हा उपाध्यक्ष बीड पदी सुमित्रा नाईकनवरे, माजलगाव तालुकाध्यक्षपदी खलील इस्माईल शेख, माजलगाव तालुका उपाध्यक्ष पदी शेख एकबाल मुस्तफा, माजलगाव तालुका सचिव पदी कुरेशी सलाम अब्दुल हक, तालुका संघटक केशव खरात, तर पात्रुड जिल्हा परिषद सर्कल अध्यक्ष पदी त्रिंबक थावरे, यांची निवड झाली आहे तर माजलगाव महिला तालुका अध्यक्षपदी स्वातीताई वाघमारे, यांची नियुक्ती करण्यात आली. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया खरात गट राष्ट्रीय अध्यक्ष सचिन खरात यांचे विचार समाजामध्ये रुजवून दलित, शोषित, पीडित, वंचित, आदिवासी, मुस्लिम, बहुजन वर्गाच्या न्याय हक्कासाठी लढत राहावे देशात अस्तित्व असलेल्या मनुवादी व्यवस्थे विरोधात संविधानाच्या रक्षणासाठी लढा तीव्र करा. जनसामान्याच्या मूलभूत प्रश्नासाठी आंदोलनात्मक तसेच राजकीय सामाजिक पवित्रा घेऊन जनआंदोलन उभे करा दलित अत्याचार ही राष्ट्रीय आपत्ती सारखी परिस्थिती असून दलित अत्याचार विरोधात आवाज उठविण्याचे काम करा जातीयता ही कोरोनापेक्षाही भयानक व्हायरस आहे हा व्हायरस नष्ट करण्यासाठी प्रयत्न करत रहावे शहर तालुका गाव पातळीवर पक्ष बांधणी करून रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया खरात हा पक्ष आणखी मजबूत करा. त्यामुळे आपल्यावर दिलेल्या जबाबदारीला आपण न्याय द्याल पक्षाच्या ध्येय धोरणानुसार काम कराल अशी अपेक्षा आहे. अशा आशयाचे नियुक्तीपत्र देऊन सर्व नवनियुक्त जिल्हा व तालुका कार्यकारणी शुभेच्छा देण्यात आल्या.

## जिंतुर तहसील मधील पुरवठा अधिकारी यांच्या मनमानी कारभाराने नागरीक त्रस्त

जिंतूर । दिव्य न्युज : सालेह चाऊस

जिंतुर येथील तहसील कार्यालयात कर्मचाऱ्याच्या अनागोदी व मनमानी कारभार चालत असून तालुक्यातील नागरीकांचे पूरवठा बाबत छोटी मोठी कामे करण्यासाठी दिरंगाई करण्यात येत असल्याची तक्रार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (अ.प.) जिंतूर तालुका उपअध्यक्ष ओबीसी सेल चे शेख.सादेक शेख.गुलाम रसुल यांनी परभणीच्या जिल्हाअधिकारी यांचे कडे दिनांक २६ सप्टेंबर रोजी केली आहे.




त्यांच्या पत्नीचे मृत्यु किमान एक वर्षापूर्वी झाले होते ते नाव रेशनकार्डातून वगळण्यात यावे या साठी वांरवार अर्ज दाखल करून ही संबंधित विभागातील अधिकारी प्रत्येक वेळी उडवा उडवी ची उत्तरे देवून कामे करीत नाही व अनेक प्रकारचे बहाने सागून नेट नाही ,साईड चलत नाही ,वरिष्ठ अधिकारी उपलब्ध नाही अश्याप्रकारचे चालढकल करून नागरिकांना विनाकारण मानसिक त्रास देतात व त्या महिला अधिकारी असल्याने त्यांना जास्त बोलता येत नाही तालुक्यातील ग्रामीण भागातील लोकांना सुद्धा त्रास असुन जिल्हाधिकारी साहेबांनी वेळीच या बाबीचा विचार करून त्याची बदली इतर विभागात करावी नसता नाईलाजाने आम्हाला लोकशाही मार्गाने आंदोलन करावे लागेल असे तक्रारीत नमुद केले आहे

## मृत्यूच्या दारातून एका लहान मुलाला नवे जीवन जीवदान दिल्याबद्दल मुसाखान यांचा सत्कार



बीड । दिव्य न्युज

बीड शहरातील चांदणी चौक परिसरात घडलेली एक घटना संपूर्ण शहराला भावूक करून गेली होती. शहरातील प्रसिद्ध समाजसेवक व भाजप नेते मुसाखान, नेहमीच्या कार्यात व्यस्त असतानाच अचानक त्यांना हृदय हेलावून टाकणारी घटना दिसली. दगडी छोट्या पुलावरून एक लहान मुलगा घसरून पाण्यात कोसळला आणि त्याच्या डोळ्यांसमोर मृत्यूचा महाभयंकर खेळ उभा राहिला.पाणी खोल होते, प्रवाहही तीव्र होता. छोटा मुलगा जीव वाचवण्यासाठी तडफडत होता. त्या क्षणी कुणीही पुढे सरसावणे म्हणजे स्वतःच्या जीवाशी खेळणे होते. याचवेळी मुसाखान यांनी त्या वाचवणाऱ्या मुलांसह त्या मुलाला वाचवलं याच कारणाने एम के ग्रुप च्या वतीने त्यांना शाल पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला यावेळी एम के ग्रुपचे मकसूद खान, बीड प्रसार चे संपादक समीर काझी, इसाक सर, रिजवान लाला, आमेर खान, शहाजमा खान, बुरहान काझी आदी उपस्थित होते.

## राज्यातील पूरग्रस्तांच्या मदतीसाठी जनता पुढे सरसावली



### जिल्हाधिकारी यांच्या मार्फत मुख्यमंत्री सहायता निधीसाठी धनादेश

बीड । दिव्य न्युज

सप्टेंबर महिन्यात राज्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे अनेक ठिकाणी विदारक अवस्था झाल्याचे दिसून आले. ही अवस्था पाहता समाजातील दानशूर आणि जागरूक नागरिक मुख्यमंत्री सहायता निधीत रक्कम पाठविण्यासाठी आपल्या परीने पुढे येऊ लागले आहेत. अशाच प्रकारे बीड येथील मंगल कार्यालय असोसिएशनने एक लाख पाच हजार रूपयांचा धनादेश तसेच ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा उद्योजक रमेशराव गंगाधरे यांनी दहा हजार रुपयांचा धनादेश जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्याकडे सुपूर्द केला. यावेळी जिल्हा प्रशासनाचे प्रमुख म्हणून शासनातर्फे त्यांनी दानशूरांचे आभार व्यक्त केले.

## पूरग्रस्तांच्या मदतीसाठी तत्काळ धाव: तलाठी शब्बीर पठाण यांची धडाडीची भूमिका चर्चेत

बीड । दिव्य न्युज

बीड शहर व परिसरात झालेल्या अवकाळी मुसळधार पावसामुळे लक्ष्मणनगर, धांडे नगर, बांगरनाला आणि इतर परिसरात पाणी घरात शिरल्यामुळे अनेकांचे संसार उध्वस्त झाले आहेत. या पाण्यामुळे घरगुती सामान, अन्नधान्य, विद्युत उपकरणे, आणि उपजीविकेची इतर साधने मोठ्या प्रमाणात नुकसानग्रस्त झाली आहेत. या गंभीर परिस्थितीत स्थानिक प्रशासनाकडून मदतीचे कार्य युद्धपातळीवर सुरु असून, तलाठी शब्बीर पठाण यांनी घेतलेली तात्काळ आणि धडाडीची भूमिका विशेषत्वाने उल्लेखनीय ठरली आहे.

*तत्काळ पंचनाम्यांची कार्यवाही

पूरानंतर लगेचच तलाठी शब्बीर पठाण यांनी परिस्थितीची पाहणी करताना नागरिकांच्या नुकसानीची खरीखुरी माहिती मिळवण्यासाठी स्वतः मैदानात उतरले. लक्ष्मण नगर, धांडे नगर, बांगरनाला आणि इतर भागात त्यांनी थेट पूरग्रस्तांच्या घरांमध्ये जाऊन नुकसानीचे पंचनामे करण्यास सुरुवात केली. त्यांच्या पुढाकारामुळे संपूर्ण भागात १००% पंचनामे लवकरात लवकर पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या नेतृत्वाखाली या कार्याची अंमलबजावणी सुरु असून, प्रशासनाने तत्काळ मदतीसाठी धोरणात्मक पावले उचलली आहेत.



धान्य कीट वाटपाची सुरुवात

नुकसानीच्या पहिल्या टप्प्यात पूरग्रस्त कुटुंबांना तातडीने अन्नधान्य उपलब्ध करून देणे गरजेचे होते. याच पार्श्वभूमीवर धान्य दुकानदार निरडे यांच्या सहकार्याने ६३ अन्नधान्य किट तयार करण्यात आल्या. त्या कीट तलाठी शब्बीर पठाण, समाजसेवक खमर भाई समाजसेवक खुर्शीद आलम यांच्या उपस्थितीत पूरग्रस्तांना वाटण्यात आल्या. ही मदत ज्या नागरिकांना सर्वाधिक गरज होती, त्यांच्यापर्यंत योग्य रीतीने पोहोचवली गेल्याचे स्थानिक नागरिकांनी सांगितले.

*प्रशासनाच्या पुढील योजना

प्राथमिक टप्प्यात अन्नधान्य वाटप करण्यात आले असले तरी पुढील टप्प्यात शासनाकडून आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न सुरु आहेत. पंचनाम्यांच्या आधारे नुकसानग्रस्त कुटुंबांना आर्थिक सहाय्य मिळावे यासाठी सर्व संबंधित विभाग सक्रिय झाले आहेत. तलाठी पठाण यांच्या सततच्या पाठपुराव्यामुळे हे कार्य जलदगतीने पार पाडले जात आहे.

नागरिकांचा सकारात्मक प्रतिसाद

पूरग्रस्त भागातील नागरिकांनी प्रशासनाच्या या तत्परतेबद्दल समाधान व्यक्त केले असून, विशेषतः तलाठी शब्बीर पठाण यांनी केलेल्या कार्याची प्रशंसा केली आहे. नागरिकांचे म्हणणे आहे की, नुकसानीच्या इतक्या मोठ्या प्रमाणात घडलेल्या घटनांनंतर देखील आमच्या भागात लवकर पंचनामे झाले आणि लगेचच मदत मिळाली, हे खूपच दिलासादायक आहे.

समारोप

या नैसर्गिक आपत्तीच्या काळात प्रशासन आणि स्थानिक कर्मचाऱ्यांनी दाखवलेली तत्परता, विशेषतः तलाठी शब्बीर पठाण यांची धडाडीची भूमिका, ही खरंतर इतरांसाठी प्रेरणादायी आहे. पूरग्रस्तांना न्याय मिळावा, आणि त्यांची पुन्हा उभारणी होण्यासाठी शासनाकडून योग्य ती मदत मिळावी, यासाठी सुरू असलेले हे प्रयत्न निश्चितच कौतुकास्पद आहेत.

# बीडमधील दगडी पुल धोकादायक ठरतोय

## खासदार-आमदारांच्या मतदारसंघात हा पुल येत असेल तर त्यांनी पुलाची पुनर्बांधणी करून लोकांवर उपकार करावेत

दिव्य वार्ता







## डांबरी लेअर वाहून गेले, पुलाच्या दगडाला दुनियाचा कचरा अडकलाय, लोकं गाडीसह नदीत पडू लागलेत

बीड । दिव्य न्युज

बीड शहरातील निजामकालीन दगडी पूल धोकादायक ठरत असून, अपघातांची मालिका सुरूच आहे. कधी नव्हे तो हा पुल सात ते आठ दिवस पाण्यात राहिला. पुरामुळे पुलावरचे डांबरी लेअर वाहून गेलेत. पुलावर असलेल्या संरक्षक दगडाला दुनियाचा कचरा अडकून पडलाय. नगर पालिकेला त्याचं काही देणं-घेणं नाही. प्रचंड मोठ्या प्रमाणात ट्रॅफिक आहे. पुल छोटा पडू लागलाय. संरक्षक कठडे नसल्याने लोकं गाड्यासह नदीत पडू लागलेत. जिल्ह्याचे खासदार आणि बीडच्या आमदारांच्या मतदारसंघात हा पुल येत असेल तर त्यांनी या पुलाची पुनर्बांधणी करून लोकांवर उपकार करावेत अशी मागणी होवू लागली आहे. बीड शहरातील दगडी पुलावरून दररोज हजारो विद्यार्थी व भाविक प्रवास करत असल्याने त्याचे महत्व मोठे आहे. मात्र पुलाची जीर्ण अवस्था, अपुरी उंची आणि सुरक्षा व्यवस्थेचा अभाव यामुळे वाहनचालकांना जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत आहे. काही दिवसांपूर्वी सायकलवरून जाताना एका मुलाचा तोल जाऊन तो पुलावरून पडला होता. तर गुरुवारी दसऱ्याच्या दिवशी एका दुचाकीस्वाराचा अपघात होऊन तो पुलावरून खाली नदीत कोसळला. स्थानिक नागरिकांच्या तत्परतेमुळे त्याला वाचवण्यात यश आले. पुलाला आजूबाजूने कोणतीही सुरक्षा व्यवस्था नसल्याने वाहनचालक सरळ नदीत कोसळत आहेत. याशिवाय या पुलाची उंची कमी असल्यामुळे पावसाळ्यात बिंदूसरा नदीचे पाणी पुलावरून वाहते. त्यामुळे हा रस्ता पूर्णपणे बंद होतो आणि नागरिकांना दोन ते तीन किलोमीटरची मोठी फेरी मारून जावे लागते. पुलावरील डांबरी रस्ता देखील मोठ्या प्रमाणात खराब झाला असून वाहतुकीच्या वरदळीला तो सक्षम राहिलेला नाही. अशा परिस्थितीत गंभीर जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. नागरिकांकडून या धोकादायक पुलाचे तातडीने पुनर्बांधणी करून सुरक्षित वाहतुकीसाठी नव्या पुलाचे काम हाती घ्यावे, अशी मागणी राज्य सरकारकडे करण्यात येत आहे.

## राष्ट्रीय बालकामगार प्रकल्प शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी संघटनेतर्फे विविध मागण्यांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एक दिवसीय लाक्षणिक उपोषण संपन्न



वडवणी । दिव्य न्युज

राष्ट्रीय बालकामगार प्रकल्प शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी संघटनेच्या वतीने दिनांक ०३/१०/२०२५ शुक्रवार रोजी सकाळी १० वा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बीड येथे महाराष्ट्र राज्य चे प्रमुख धर्मशिल मिश्राम सर यांच्या नेतृत्वाखाली व माजी प्रकल्प संचालक तथा भाजपा कामगार मोर्चा बीड जिल्हा अध्यक्ष ओमप्रकाश गिरी सर व शेख अफसर बशीरमिया सर क्षेत्रीय अधिकारी यांच्या प्रमुख उपस्थितीत एक दिवसीय उपोषण व लक्षवेधी आंदोलन करण्यात आले . राष्ट्रीय बालकामगार प्रकल्पातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या पदावर २००४ पासून अत्यंत अल्प मानधनावर कार्यरत होते. सदरील प्रकल्प हा २०२१ पासून समग्रह शिक्षा अभियानात विलिन करण्यात आला आहे. विलीन करताना यामध्ये महाराष्ट्रातील सोळा जिल्ह्यातील कर्मचाऱ्यांचा कोणताही शिक्षक कर्मचारी चा विचार करण्यात आलेला नाही . बीड जिल्ह्यातील ११० कर्मचारी कर्मचाऱ्यांवर तसेच महाराष्ट्रातील २२०० शिक्षक कर्मचारीवर बेरोजगारीची कुऱ्हाड केंद्र शासनाच्या या निर्णयामुळे कोसळली आहे. २००४ पासून महाराष्ट्रातील या प्रकल्पात काम दिलेल्या सेवेचा मोबदला म्हणून २०१६ पासून राज्य शासन तथा केंद्र शासन यांच्याकडे शासकीय सेवेत


►► पान २ वर

## जिंतूर तालुक्यातील बोरीत गावात रक्तरंजित हणामारी ; जुन्या भांडणातून युवकावर हल्ला, जातीवाचक शिवीगाळ, लोखंडी गजाने मारहाण!

जिंतुर । दिव्य न्युज : सालेह चाऊस

जिंतूर तालुक्यातील बोरी गावातील परिसरात दिनांक ०२ अक्टोबर रोजी गुरुवारी रात्री दहशतीने थरथरला होता. जुन्या वैमनस्यातून तिघा आरोपींनी एका तरुणावर जातिवाचक शिवीगाळ करत लोखंडी गज व लाथाबुक्यांनी जबर मारहाण केली. इतकंच नाही तर जिवंत ठेवणार नाही अशी धमकीही दिली. या घटनेने संपूर्ण बोरी परिसर हादरला गेला होता नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले होते.

फिर्यादी समर्थ अशोक नितनवरे (वय २०वर्ष रा. श्रीनिवास नगर, बोरी) यांच्यावर हा हल्ला झाला. दि. ०२ ऑक्टोबर रोजी रात्री साडेआठच्या सुमारास कौसडी रोडवर नासेर खान यांच्या आरामशी च्या दुकाना जवळील सार्वजनिक रस्त्यावर आरोपींनी कट रचून घेराव घातला. आरोपी बालाजी गोपीनाथ चांदीवाले व जिवन गवारे , किशोर चांदीवाले (रा. बोरी) यांनी संगनमत करून हल्ला केला. यामध्ये आरोपी बालाजीने हातातील लोखंडी गज फिर्यादीच्या डाव्या डोळयाजवळ जोरात मारल्यामुळे. त्यास गंभीर दुखापत झाली. तर उर्वरित दोघांनी शिवीगाळ करत लाथाबुक्यांनी मारहाण केली. जातिवाचक शब्दांचा भडीमार करत जिवे मारण्याची धमकी देण्यात आली. या प्रकरणी बोरी पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर नं. २५३/२०२५ अंतर्गत कलम ११८(१),२९६, ११५(२), ३५१(२), ३५२, ३(५ ) बीएनएस सह कलम ३(१) ( आर)( एस अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायद्या नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादीची तक्रार पीएसआय श्री एस.एम. थोरवे यांनी नोंदविली. घटनेनंतर संपूर्ण बोरी परिसरात प्रचंड खळबळ उडाली. प्रकरणाची गंभीर दखल घेत मा.सहाय्यक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी जिंतूर श्री.जिवण बेनिवाल यांनी घटनास्थळी धाव घेऊन पाहणी केली. त्यांच्यासह सहाय्यक पोलीस निरीक्षक सुनील गोपीनवार यांनीही सविस्तर माहिती घेतली. पोलिसांनी पुढील तपास वेगाने सुरू केला असून आरोपींना अटक करण्यासाठी हालचाली सुरू आहेत.



## सांगा नेमके काय घडले होते? यश ढाकाच्या मित्र-मैत्रिणींची चौकशी

### एसपींकडून आढावा : युवासेना जिल्हाप्रमुख अजूनही मोकाटच

बीड । दिव्य न्युज

शहरातील माने कॉम्प्लेक्स परिसरात पत्रकार देवेंद्र ढाका यांचा मुलगा यश ढाका याचा चाकूने भोसकून खून करण्यात आला होता. या प्रकरणात तीन आरोपीस अटक झाली असून शिंदे गटाचा युवासेना जिल्हाप्रमुख गणेश शिराळे अजूनही मोकाटच आहे, तर दुसऱ्या बाजूला पोलिस अधीक्षक नवनीत काँवत यांनी शुक्रवारी दुपारी स्थानिक गुन्हे शाखेत बसून यशच्या मित्र आणि मैत्रिणींची कसून चौकशी केली. त्या रात्री काय घडले? आणि नेमके कारण काय? याची माहिती घेण्यात आली. जिल्ह्यात मागील काही दिवसांपासून खुनांची मालिका सुरूच आहे. त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. पोलिसांचा कसलाही धाक नसल्याचा आरोप केला जात आहे. अशातच बीड शहरातील गजबजलेल्या माने कॉम्प्लेक्स परिसरात यश ढाका याचा भर रस्त्यावर खून करण्यात आला. याचा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर लोक आक्रमक झाले. बाबुराव पोटभरे, डॉ. जितेंद्र ओव्हाळ, सुजात आंबेडकर आदींनी यावर आवाज उठविला. ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांनी

►► पान २ वर

### 'त्या' मुलीचीही चौकशी

यश ढाका याचा खून मुलीला का बोलतो या कारणावरून झाल्याचे सांगण्यात आले होते. या प्रकरणातील मुलीचीही चौकशी करण्यात आली. सोबतच त्याचे मित्र आणि व्हायरल व्हिडीओ, सीसीटीव्ही फुटेजमध्ये दिसणाऱ्यांचीही चौकशी करण्यात आली. यावेळी अपर पोलिस अधीक्षक सचिन पांडकर, पोलिस निरीक्षक शिवाजी बंटेवाड आदींची उपस्थिती होती.



### घेतली प्रकाश आंबेडकरांची भेट

मोकाट असलेल्या दोन आरोपींना तातडीने अटक करावी, या मागणीसाठी ढाका कुटुंबीयांनी वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांची छत्रपती संभाजीनगर येथे भेट घेतली. ॲड. आंबेडकर यांनी तत्काळ वकिलांशी चर्चा केली, तसेच समाजकल्याण विभागाचे सहायक आयुक्त ►► पान २ वर

## परळीत अनधिकृत पेट्रोल विक्रेत्यांची सुळसुळाट ! प्रशासन गाढ झोपेत

परळी । दिव्य न्युज

परळी शहरासह तालुक्यात अनधिकृत पेट्रोल विक्रेत्यांचा धुमाकूळ सुरू असून प्रशासनाचे याकडे साफ दुर्लक्ष असल्याचे चित्र समोर आले आहे.

चौकाचौकात, गल्ली बोळात अगदी परळी शहरातील गजबजलेल्या भागातही प्लास्टिकच्या बाटल्यांमध्ये व डब्यांमध्ये पेट्रोलची खुलेआम विक्री सुरू आहे. पेट्रोल पंपावरील दरापेक्षा १० ते १५ रुपये जास्त दर आकारून हा बेकायदेशीर धंदा रंगत असून नागरिकांच्या खिशावर ताण येत आहे. त्याहून मोठे म्हणजे, अग्निसुरक्षा नियमांचा फज्जा उडवत होणारी ही विक्री कधीही भीषण अपघाताला आमंत्रण देऊ शकते, अशी भीती व्यक्त होत आहे.



नागरिकांचा संताप

स्थानिक नागरिकांनी याविरोधात अनेकदा तक्रारी करूनही कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने संताप व्यक्त केला जात आहे. आमच्या भागात रोज रस्त्याच्या कडेला,चौकात पेट्रोल विकले जाते. एखादी ठिणगी पडली तर भीषण दुर्घटना होईल, पण तरीही प्रशासन झोपेत आहे, असे एका नागरिकाने संताप व्यक्त केला.

पोलिस व प्रशासनाची भूमिका?

या संदर्भात प्रशासनाने अद्याप कोणतीही मोठी कारवाई केलेली नाही. काही ठिकाणी केवळ औपचारिक दंड वसूल करून प्रकरण मिटवले जाते. त्यामुळे अशा अनधिकृत

►► पान २ वर

## जीवदान; जिल्हा रुग्णालयात पहिली अँजिओग्राफी यशस्वी

### कॅथलॅब सेवेची सुरुवात; महागडे उपचार मोफत

### उपचार करणारी टीम

जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय राऊत, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संतोष शहाणे, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. एल. आर. तांदळे, डॉ. हनुमंत पारखे आणि मेट्रन रमा गिरी यांच्या मार्गदर्शनाखाली ही यशस्वी प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. यामध्ये डॉ. सुनीता बारकूल, डॉ. सुनील बोबडे, इन्चार्ज वंदना उबाळे, रेखा वणवे, शीतल पाटील, राणी बांगर, देशमुख आदी कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला.

### जिओग्राफी तपासणी कशी असते?

अँजिओग्राफी ही हृदयविकाराच्या निदानासाठीची तपासणी प्रक्रिया आहे. यात रक्तवाहिनीतून एक कॅथेटर (नळी) आत टाकून विशिष्ट रंग सोडला जातो. या रंगामुळे रक्तवाहिन्यांमधील अडथळे किंवा अरुंद भाग एक्स-रेमध्ये स्पष्टपणे दिसतात. रक्तप्रवाह तपासण्यासाठी आणि पुढील उपचाराची दिशा ठरवण्यासाठी ही प्रक्रिया महत्त्वाची आहे.



जिल्हा रुग्णालयातील कॅथलॅबमध्ये शुक्रवारी पहिली अँजिओग्राफी झाली. यावेळी डॉ. संजय राऊत यांच्यासह टीम.

बीड । दिव्य न्युज

जिल्हा सामान्य रुग्णालयातील अद्ययावत कॅथलॅब सेवा आता पूर्ण क्षमतेने सुरू झाली असून, शुक्रवारी (दि. ३) दुपारी येथे पहिली अँजिओग्राफी यशस्वीरीत्या करण्यात आली. वेळेत उपचार मिळाल्याने बीडमधील एका ६५ वर्षीय वृद्धाला जीवदान मिळाले आहे.

१७ सप्टेंबर रोजी उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांच्या हस्ते या कॅथलॅबचे उद्घाटन झाले होते. त्यानंतर आवश्यक डॉक्टर आणि परिचारिका यांची भरती करून ही सेवा सुरू झाली. दोन दिवसांपूर्वी बीडमधील एका रुग्णाची टूडी इको तपासणी करण्यात आली होती. यामध्ये रुग्णाच्या हृदयातून रक्त पुढे ढकलण्याची प्रक्रिया कमकुवत झाल्याचे स्पष्ट झाले. अँजिओग्राफीमध्ये त्यांच्या दोन नसा पूर्णपणे ब्लॉक (बंद) असल्याचे निदान झाले. यामुळे त्वरित ॲन्जिओप्लास्टी करणे शक्य नव्हते. डॉक्टरांनी या रुग्णाला बायपास शस्त्रक्रियेचा सल्ला दिला असून, त्यावरही लवकरच निर्णय घेतला जाणार आहे. शासकीय रुग्णालयात अत्यंत महागडे असलेले हे हृदयविकाराचे उपचार आता मोफत मिळत असल्याने सामान्य नागरिकांमधून मोठे समाधान व्यक्त होत आहे.

### ॲन्जिओप्लास्टी आणि उपचार

ॲन्जिओप्लास्टी ही बंद झालेल्या रक्तवाहिन्या उघडण्याची उपचार प्रक्रिया आहे. अँजिओग्राफीनंतर लगेच ही केली जाते. यात अडथळ्याच्या ठिकाणी एक बारीक फुगा पोहोचवून तो फुगवला जातो, ज्यामुळे रक्तवाहिनी रुंद होते. बहुतेक वेळा, रक्तप्रवाह कायमस्वरूपी सुरळीत ठेवण्यासाठी त्याच जागी स्टेन्ट बसवला जातो.




हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहम्मद अबुबकर यांनी माऊली ऑफसेट एमएसईबी ऑफीससमोर माळीवेस बीड येथे छापून सां.दिव्यवार्ता कार्यालय कोहिनूर बेकरीजवळ, इस्लामपुरा रोड, बाबा चौक, भालदारपुरा बीड येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधुन व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.वाद विवाद बीड न्यायालय अंतर्गत मो.९३७१२९१०४२, ९५४५३८१२२०, फोन नंबर : ०२४४२-२३१२२०, फॅक्स नंबर : ०२४४२-२३१२२०